पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८, विद्युत मुख्य कार्यालय,
क्र.विमुका/०१/कावि/१०५६/२०२१
दिनांक :- १४/ १० /२०२१

**विषय :- मनपाच्या विविध विषय समित्यांच्या कामकाजाअंतर्गत विषयपत्रिकेवर अंतर्भुत होणा-या (मंजूरीकरिता सादर झालेल्या) विषयांबाबत सविस्तर टिपण सभेच्या दिनांकाच्या एक दिवस अगोदर सह शहर अभियंता (वि) यांचे कार्यालयास नियमीतपणे सादर करणेबाबत...**

**परिपत्रक,**

महानगरपालिकेच्या विविध विषय समित्यांच्या बैठका दर आठवड्याला / दरमहा होत असतात. सदरच्या सभेमधील विषयपत्रिकेवरील विषयांबाबत अनेकदा संबंधित कार्यकारी अभियंता (वि) यांनादेखील पुरेशी माहिती नसते व त्याबाबत सह शहर अभियंता (वि) यांचेकडेदेखील सविस्तर टिपण लिखीत स्वरूपात सादर केलेले नसते. तसेच काही वेळेस विषयाशी संबंधित असलेले कार्यकारी अभियंता (वि) रजेवर असतात अथवा त्यांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्कही होत नाही. त्यामुळे अनेकदा विषय चर्चेकामी आल्यानंतर त्यावर सविस्तर माहिती देण्यामध्ये व त्याचे मंजूरीकामी अडथळा निर्माण होतो.

सबब, उपरोक्त बाबी लक्षात घेऊन या परिपत्रकान्वये सर्व संबंधित कार्यकारी अभियंता (वि) यांना कळविणेत येते की यापुढे विविध विषय समित्यांच्या कामकाजाअंतर्गत विषयपत्रिकेवर अंतर्भुत होणा-या (मंजूरीकरिता सादर झालेल्या) विषयांबाबत सविस्तर टिपण (उदा. निविदेची माहिती, निविदेस येणारा खर्च, कामाचा कालावधी, तांत्रिक माहिती इ.) सभेच्या दिनांकाच्या एक दिवस अगोदर सह शहर अभियंता (वि) यांचे कार्यालयास नियमीतपणे सादर करणेत यावे. याबाबत विलंब / दिरंगाई अपेक्षित नाही.

१४/१०

**(संदेश चव्हाण)**
**सहशहर अभियंता (वि)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रत :- कार्यकारी अभियंता (वि)
अ /ब / क / ड /इ / फ / ग व ह क्षेत्रीय कार्यालय